# प्रभुतरुण

| वर्ष ४९ | अंक २ | मुंबई | ऑगस्ट २०१५ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## उडदामाजि काळेगोरे

—सुहासिनी कीर्तिकर

महाराष्ट्रात सध्या भारतीय जनता पक्ष सत्तेत आहे. केंद्रात तर तो सार्वभौमच. त्यामुळे अर्थकारण, शेती, राजकारण, शिक्षणक्षेत्र या सगळ्या क्षेत्रांत अनेक योजना नवा चेहरा घेऊन येत आहेत. अनेक योजना पुन्हा नव्याने सुरू होत आहेत. उदा : - महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या निवडणुका. या निवडणुका पुन्हा सुरू करावयात यासाठी शिक्षणमंत्र्यांनी सुतोवाच केले आहे. याची चाहूल बातम्यांतून लागताच मला आठवल्या आमच्या काळातील निवडणुका. पुढील आयुष्यातील व्यवस्थापनाचे, राजकारणाचे शिक्षण देणारा तो एक आखाडाच होता. या आखाड्यात खिलाडूपणे खेळून अंगाला धूळ माती लागली तरच पुढचे सारे आयुष्य खिलाडूपणाने घेता येते. प्रसंगी विचारांचे, मतखंडनाचे चार हात खेळता येतात. आमच्या काळात या निवडणुका हिरीरीने लढल्या जात. पण बेताबेतानेच. म्हणजे निवडणुकीला एखादा उभा राहिला तर कॉलेज कॅन्टीनमध्ये चहाची फैर झडे. फार फार तर त्याकाळी चलनी असणारा मिसळपाव जिभेला चव आणी. उमेदवार आपल्या गाडीतून मित्रांची ने आण करी. सिनेमा 'टाकला' जाई! ('सिनेमा टाकणे' बरं का!) असं निवडणुकीत जिंकून बिंकून आलं की होणाऱ्या फायद्यातून एखादी पॅण्ट सुटे. भाव वधारे. यांना लायब्ररीशी वावडं. पण जिमखाना, ग्राउंड, कॅन्टीन, हो! अन् मुख्य म्हणजे 'कॉलेज डे' वगैरेंवर यांची सत्ता. पण नंतरच्या काळाच्या तुलनेत हे निवडून येणारे निरुपद्रवीच. म्हणजे प्राध्यापकांना यांचा धाक नसे. उलट वाङ्मयमंडळांच्या निवडणुकीत प्राध्यापकांनाही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत रस असे. त्याकाळी प्रत्येक वाङ्मयमंडळाचे भरघोस कार्यक्रम व्हायचे. मराठी तीन अंकी नाटकं बसविली जायची. आमचे वि.मा.दी. पटवर्धन (खरं तर ते विज्ञानशाखेत होते पण त्यांना नाटकं बसवायचा सोस. लेखक होते ना ते!) ग. म. राजर्षी (पुढे हा विद्यापीठात शासन सचिव झाला!) शंकर वैद्यसर यांचा पुढाकार असे. मराठी, हिंदी, इंग्रजी सोबत 'संस्कृत रसिकवृंद' ही होतं तेव्हा. संस्कृत नाटकं उभी करायची म्हणजे गुणवत्ता हवीच. आणिक कसले कसले 'फोरम' असायचे. या सगळ्यासाठी चांगले विद्यार्थी हेरून त्यांना 'उभं' करणं सगळ्या प्राध्यापकांनाही हवं असायचं. मग रीतसर निवडणुका. त्या जिंकल्याचा हल्लागुल्ला. पण या निवडणुकांत कुणावर हल्ला झाल्याचं अगदी 'माहीर' कॉलेजमध्येही ऐकीवात नव्हतं. बाहेरच्या जगातील लोकशाही भूषवणाऱ्या निवडणुकांचं ते इवलंसं तरारलेलं रूप होतं. निरोगी, सशक्त. जसा जिमखाना, जसं एनसीसी, जसं उंडारणं मित्रांबरोबर तस्संच निवडणुकांत भाग घेणं निरोगी आणि विकसनशील असंच होतं.

पुढे काळाची पावलं पुढे पुढे पडत गेली. अनेक गोष्टींनी भलीबुरी कात टाकली. 'कॉलेज डे' म्हणजे ढाऽऽम् ढुऽऽम करणाऱ्या वाद्यवृंदाचा 'इव्हेन्ट डे' होत गेला. जनरल सेक्रेटरी म्हणजे 'जी.एस.' असणं ही सत्ताकारणाची सुरूवात ठरू लागली. मी कॉलेज विश्वात विद्यार्थिनी असतानाच्या निवडणुका प्राध्यापक म्हणून वावरताना विलक्षण वेगळ्या झाल्या. 'स्टुडण्टस् कौसिल' साठी आता निवडणुकात विद्यार्थी म्हणून भाग घेणं नव्हतं; त्या निवडणुकांचं आयोजन प्राध्यापक म्हणून अंगावर होतं. अशावेळी शिस्तीसाठी सगळ्या उमेदवारांवर नजर ठेवणं आलं. पूर्वी ते नव्हतं असं वाटतं. याला अगदी मोठ्ठं कारण म्हणजे आपल्या प्रगतीशील लोकशाहीत मतदाराचं वय १८ वर आलं. महाविद्यालयात शिकणारा, कोवळ्या वयाचा विद्यार्थीवर्ग मतदार ठरताच बाहेरचे राजकारण कॉलेजच्या (शिक्षणाच्याही) भिंती

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## उंबरठ्याबाहेर

सौ. त्वरिता संजय दळवी

प्रथमतः, माझ्या मागील लेखा-बद्दल ज्यांनी मला फोन करून आपली पसंती कळवली त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. तसेच विशेष आभार श्री. अनिल राव यांचे. लेखणी उचलून आपण आपले विचार, आपले अभिप्राय आम्हाला कळवलेत. मनापासून धन्यवाद. प्रभू कट्ट्याबद्दलची आपली कल्पना खरच छान आहे. ती प्रत्यक्षात उतरवणे आता ज्ञातीबांधवांच्या/ संस्थांच्या हाती आहे. मिळालेल्या प्रतिसादावरून इतके मात्र नक्की, की विषय पुष्कळ लोकांच्या मनातला होता म्हणूनच त्यांना तो भावला. मला आनंद आहे की काही परभांनी एका समारंभात भेटल्यावर त्यावर चर्चाही केली.

असो. खरं सांगायचे तर ह्या अंकात लेख लिहिणे जमेल की नाही हेच मला कळत नव्हते. घर आणि ऑफिस सांभाळताना इतकी तारांबळ उडते की काही विचारू नका! पण मग जसे जमेल तसे आणि जमेल त्या ठिकाणी लिहायचं असे मनाशी ठरवले. विषय पुष्कळ असतात; पण हातात लेखणी घेतल्यावर शब्द सुचतील तर खरं! शब्द सुचले तर मराठीत टाइप करण्याचे दिव्य पार पाडायचे असते. त्यात डेडलाइन पटापट जवळ सरकत असते.

शिवाय (गैरसमजग्रस्त) मन सांगत असते की, लिहिले तर पाहिजेच, कारण ज्ञातीतील सुजाण वाचकवर्ग आपल्या लेखाची आतुरतेने (?) वाट पहात असेल. जोक्स अपार्ट. काही दिवसांपूर्वी महिला समाजाच्या एका समारंभात भाग घेतला तेव्हासुद्धा माझी हीच अवस्था होती.

आम्ही कलाकारांनी जेमतेम ३ ते ४ वेळा तालमी घेतल्या. २ तास तालीम, ३ तास प्रवास, असे आठवड्यातले ५ तास आणि महिन्यातले ४ दिवस मी माझ्या 'कले'साठी घाईगडबडीत 'अर्पण' केले. कार्यक्रम उत्तम झाला कारण तो सिद्धीस नेण्यास 'श्री समर्थ' होते शिवाय ते आमच्या धावपळीचे आणि मेहेनतीचेही फळ होते.

सामाजिक कार्यात तसेच कला क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचे मला सादर कौतुक वाटते. घरच्या जबाबदाऱ्या आणि स्वत:ची आवड याची सांगड त्या कशा काय घालतात हेच मला कळत नाही. मला त्यांच्या बद्दल कुतूहल आहे. कारण 'तरुणा'च्या एका मीटिंगला जायचे म्हटले तरी मला कित्येक बाबींकडे लक्ष द्यावे लागते.

प्रथम घरच्यांचा मूड पाहून मला माझ्या जाण्याचा प्रस्ताव मांडावा लागतो. मग सगळे (माझे पतिराज आणि माझी कन्यका) माझ्याकडे 'हम्म्म...' करून बघतात. 'झालं हीचं सुरू ...!'

ह्या अर्थाच्या नजरा माझ्यावर रोखल्या जातात. एका रात्रीच्या 'यज्ञकर्माची' व्यवस्था ते दोघे आपापसात वार्तालाप करून ठरवतात. अर्थात या विचार-विनिमयात मला स्थान नसतंच. 'काय करायचे ते आम्ही बघून घेऊ!' असे घायाळ स्वर कानी पडतात. मीही दुर्लक्ष करते.

तयार होऊन मी बाहेर पडेपर्यंत घरात (वादळापूर्वीची) शांतता असते. मी दारापर्यंत जाणार तोच कुणीतरी 'चहा हवाय' असे सुचवतो. मग मनातल्या मनात १-१० अंक मोजत माझा मोर्चा स्वयंपाकघराकडे वळतो. चहाचे आधण जसजसे उकळते तसतसे बरेच काही उकळत असते. माझा सावळा रंग जांभळा-निळा व्हायला लागतो. स्वयंपाक घरातले खण आणि कपाटाचे दरवाजे ताल धरतात. कपबशा सूर काढतात. मग नवीन मागण्या व्हायच्या आत, लेकीला उगाचच दरडावून, सर्वांना चहा द्यायचा हुकुम सोडून मी घरातून काढता पाय घेते.

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

ओलांडून आत शिरलं. राजकीय पक्षांचे, गटांचे प्रतिनिधी असणारे (वा, करून घेतलेले) विद्यार्थी निवडणुकांच्या रिंगणात उतरू लागले. बैलगाडीतून मिरवणुका निघू लागल्या. विरोधी गटाच्या प्रतिनिधींना धमक्या मिळू लागल्या. क्वचित् त्यांना निवडणुकीच्या दिवसाआधी मारहाण होऊ लागली. कोंडून ठेवलं जाऊ लागलं. मग आपली नावं मागे घेणं आलं. बरं; हे सगळं कॉलेजच्या आवाराबाहेर घडत असल्यानं कॉलेजप्रशासन काही करू शकत नव्हतं. फार, फारतर त्या विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन काही सौम्य मार्ग काढता येत असेल तर तसंही काही प्राध्यापक करीत. नाही असं नाही. पण एकूण अशा मार्गाने निवडून आलेल्या विद्यार्थ्यांपासून सावध रहाणंच शहाणपणाचं ठरत गेलं. काही उपक्रम त्यावर इलाज करीत. उदा - महिन्यातून एकदा सर्वांनी भेटून मनमोकळ्या गप्पा करणं. राष्ट्रीयत्व जागवणं. एनएसएस, गिर्यारोहणसारख्या प्रकल्पात त्यांचा सहभाग करून घेणं. पण पूर्वीचं निवडणुकांचं निरोगी रूप राहिलं नाही हे खरंच. 'आमच्यावेळी हे असं नव्हतं'चा सूर मला इथे नाही आळवायचा. पण ही काळाने टाकलेली अपरिहार्य अशी पावलं होती. शिवाय या काळात मुलांकडे पैसा भरपूर, चैनीच्या व्याख्या वेगळ्या. कानात वारं शिरलेलं. मग घडली ती चर्रर.... करणारी घटना. मुंबईच्या उपनगरातील नामवंत कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा निवडणुकात अक्षरशः 'गेम' केला गेला. उमेदवार मारलाच गेला. मग विद्यापीठाच्या अधिसभेत (सिनेटमध्ये) त्याचे पडसाद उमटले. अन् विद्यापीठाने एकमताने या निवडणुकाच बंद केल्या.

बंद केल्या; पण प्रत्येक गोष्टीला चांगली वाईट बाजू असतेच. 'बंद' मुळे वाईट प्रकार बंद झाले. नेमणुका होऊ लागल्या. पण यात लोकशाही कुठे होती? याच विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांचा विकास साधण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यातून कार्यरत झाली. प्रसिद्ध लेखक द. मा. मिरासदार यात स्वत:ला झोकून देत. याच परिषदेच्या कार्यप्रांगणातून गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन पुढे सार्वजनिक राजकारणात उतरले. या विद्यार्थी संघटनेमुळे बाहेरील अंतरंगाचा राजकीय वेध घेतला जाऊ लागला. 'स्टुडंटस् कौंसिल'चीच ही परिणती होती ना? 'अंधेरेमे एक प्रकाश - जयप्रकाश जयप्रकाश' असा नारा देत कॉलेजाकॉलेजातून अनेक विद्यार्थी लोकशाहीविरोधकांच्या विरोधात संघटितपणे उभे राहिले ते या निवडणुकांची आणि स्टुडंट कौंसिलच्या कार्यपद्धतीची त्यांना ओळख झाली होती म्हणूनच ना?

ही अशी ओळख होणं म्हणजे स्वत:ला पारखणं. चांगल्या उपक्रमांत स्वत:ला झोकून देण्यासाठी सिद्ध करणं. आता पुन्हा नव्याने अशा निवडणुका व्हाव्यात म्हणून शिक्षणमंत्री सकारात्मक विचाराधीन आहेत. हिणकस जळून विद्यार्थ्यांमधील उर्जेचे सकारात्मक परिणत रूप यातून झळाळून उठेल अशी आस मनी धरू या. काय? नाहीतर मग आहेच - 'उडदा माजि काळेगोरे काय निवडावे?' अशी अलिप्त भावना. पण असं अलिप्त राहून कधीच कुणाचं काही भलं होत नाही. म्हणून भले चिंतूया. निवडणुकांचं चांगभलं!

## ओजस अमित प्रधान Des Moines (IOWA) U.S.A.चे यश

- सौ. सुरूचि अनिल प्रधान
(पूर्वाश्रमीच्या सुरुचि सदाशिव धुरंधर)



२५ एप्रिल २०१५ रोजी रात्री माझा मुलगा अमित याचा अमेरिकेहून फोन आला की, 'आई, बाबा; ओजसला गव्हर्नर्स अॅवॉर्ड देण्यात येणार आहे. तुम्हाला सर्वांना त्याच्या graduation साठी यायचे आहे. ओजस आमचा नातू यावर्षी उत्तम गुणांनी १२ वी पास झाला. हा सोहळा ६ मे २०१५ रोजी झाला. या दिवशी त्याला degree of associate of arts दिली गेली.

आम्ही दोघे १७ मेला मुंबईहून निघून १८ मे ला अमेरिकेला पोहोचलो. प्राजक्ताच्या (आमच्या सुनेच्या) माहेरची मंडळी पण आमच्याबरोबर होती. दुसऱ्या दिवशी माझी बहीण बागेश्री व तिचे यजमान पण आले.

२० मे २०१५ रोजी संध्याकाळी ओजसच्या Valley High School या शाळेच्या मोठ्या हॉलमध्ये बक्षिस समारंभ होता. आम्ही सर्वजण लवकरच तेथे गेलो. व्यासपीठावर शाळेचे मुख्याध्यापक व इतर मान्यवर बसले होते. ओजसला अनेक बक्षिसे मिळाली. बक्षीस समारंभ फारच छान झाला.

२४ मे २०१५ या दिवशी ओजसचे graduation होते. Des Moinesमधील Knap centreमध्ये हा समारंभ होता. आमच्याकडचे आम्ही जवळजवळ ३० जण या समारंभास गेलो होतो.

बरोबर ११ वाजता समारंभास सुरूवात झाली. स्टेजवर सर्व मान्यवर होते. स्टेजच्या पुढेच विद्यार्थ्यांचे बँड पथक होते. मंद आवाजात सूर ऐकू येत होते. ज्या विद्यार्थ्यांनी विशेष नैपुण्य मिळविले होते; त्यांना पुढच्या रांगेत बसण्याची व्यवस्था होती.

प्रथम processionने येऊन विद्यार्थ्यांनी आपापल्या जागा घेतल्या. सभोवार इतर सर्व लोकांची बसण्याची व्यवस्था होती. कुठेही कसलाही गोंधळ नव्हता. प्रत्यक्ष कार्यक्रमाला सुरूवात झाल्यावर अमेरिकेचे राष्ट्रगीत बँडवर वाजवण्यात आलं. मान्यवरांची भाषणे झाली. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या मानाप्रमाणे व्यासपीठावर बोलावून certificates देण्यात आली. विद्यार्थ्यांतर्फे ओजसला विद्यापीठा-वरून बोलण्याची संधी देण्यात आली. १७ वर्षांचा आमचा ओजस गाऊन व कॅप घालून फारच छान दिसला. आम्हा आजी, आबांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

(ओजसचे 'प्रभुतरुणा'तर्फे हार्दिक अभिनंदन. - संपादक)

विस्तारीत संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

याचा अर्थ असा नाही की माझ्या घरच्यांना माझ्यातील कलागुणांचे कौतुक नाही. कौतुक आहेच. परंतु मी बाहेर जाते म्हटले की साऱ्यांच्या मनात एकाएकी माझ्याबद्दल प्रेम दाटून येते! मग मला माझ्या कलेची जोपासना त्यांच्या कलेकलेने करावी लागते!

माझा असा अनुभव गाठीशी बांधून, इतर महिलांच्या 'उंबरठ्या बाहेरील विश्वाकडची झेप' याचा उलगडा करण्याचा जेव्हा मी प्रयत्न करते तेव्हा माझा गोंधळ उडतो. माझ्या काही मैत्रिणी आहेत ज्या घर सांभाळून स्वत:च्या आवडीनिवडीही सांभाळतात. कित्येकदा मला त्यांचा हेवा वाटतो. यांच्यावर बंधने नाहीत का? या कशा काय सर्व नीट पार पाडतात? काही मैत्रिणी घरात कमी आणि बाहेर जास्त असतात. आमचे एक मित्रवर्य आमच्या अशा मैत्रिणींना 'भटक्या जमातीतल्या' म्हणून संबोधतात!

एका मैत्रिणीच्या सासूबाई , आम्ही त्यांच्या घरी गेल्यावर, सूनेचे कौतुक करताना थकत नाहीत. तिचे समाज कार्य, तिचा सामाजिक दर्जा, वगैरे वगैरे याचे गुणगान करत असतात. पण तिची पाठ फिरल्यावर विचारतात, 'तू नाही का ग जात लष्करच्या भाकऱ्या भाजायला?' त्यांच्या मते सुनेने घराकडे जरा लक्ष द्यायला हवे. मैत्रिणीचे म्हणणे असते की, 'घराकडे लक्ष द्यायला सासूबाई आहेत मग तिने तिच्या आवडीच्या क्षेत्राकडे लक्ष दिले तर कुठे बिघडले!'

दुसरी मैत्रीण नाटकात/सीरीअल्स मध्ये काम करते. तिचे शेड्युल अगदीच धकाधकीचे. शूटिंग आणि दौरे सांभाळताना ती आमच्या ग्रुपलासुद्धा क्वचितच भेटते. तिचा नवरा (आमचा मित्र) बायकोच्या टॅलेंटवर जाम खुश असतो. ती किती सुंदर आहे आणि काय अप्रतिम काम करते हे तो नेहमी सांगतो. पण २ डाऊन आणि सारे बंध तुटतात.

असं का होतं? जेव्हा स्त्रियांच्या आवडीचा प्रश्न येतो तेव्हा बंधनं उफाळून का येतात?

आपल्या ज्ञातीतील कित्येक संस्थांच्या कार्यकारिणीवर खूप महिला कार्यरत आहेत. अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष ते सामान्य सभासद म्हणून साऱ्या पदांचा कारभार त्या व्यवस्थित सांभाळतात. इतरही महिला नाट्य-चित्रपट क्षेत्रात चमकतात. कित्येक जणी शिक्षण क्षेत्रात अव्वल कामगिरी बजावतात. त्यांनाही अशाच दिव्यातून जावे लागते का? नोकरी करणाऱ्या स्त्रियांचीही अशीच तारेवरची कसरत असते. घर आणि ऑफिस सांभाळण्यात दिवस जात असतात आणि या दोन बेटांच्या मधल्या प्रवाहात तिची आवड, तिची कला गटांगळ्या खात असते किंवा तीच आपल्या आवडीनिवडींना तिलांजली देते.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवडीनिवडी जोपासण्याचा हक्क असतो. आपल्यातील टॅलेंटचे कौतुक व्हावे असेही वाटत असते. पण सर्वांना ते जमत नाही. काहींना घरचा पाठिंबा नसतो. काहींना आर्थिक पाठबळ नसतं. तर काहीजणींना स्वत:च्या आनंदासाठी वेगळं काहीतरी करण्याचीच भीती वाटते. माझी विनंती आहे की ज्ञातीतील कर्तृत्ववान महिलांनी मला व माझ्यासारख्या इतर भगिनींनाही सांगावे की, घर आणि आवड यांची सांगड त्या कशा घालतात. टाइम मॅनेजमेंट कशा करतात. आम्हाला मार्गदर्शन करावे. म्हणजे पुढच्या 'तरुण'च्या मीटिंगला जाताना माझ्या किचनमध्ये फक्त रेडियोचे सूर ऐकू येतील.

*

## पाठारे प्रभु सोशल समाज एक दिवसीय वर्षासहल

पाठारे प्रभु सोशल समाजाची एक दिवसीय वर्षासहल यंदा रविवार दि. १२ जुलै, २०१५ रोजी वसई येथील 'वेस्ट पाम बीच रिसॉर्ट'येथे नेण्यात आली होती. नेहमीच्या उत्साहाने काही जुने व काही नवीन ज्ञातीय सहभागी होऊन एक बस मुंबईहून तर दुसरी बस अंधेरीहून काढण्यात आली. सुरुवातीलाच विश्वस्त श्रीमती वंदना नवलकरांनी सर्वांचे स्वागत करून सहलीचा श्रीगणेशा केला. सौ. सुजाता व श्री. तुषार कीर्तिकर यांच्यातर्फे देण्यात आलेल्या लाजवाब सँडवीचने, त्यापाठोपाठ सौ. शील व श्री. प्रफुल्ल राणेंकडचे नरम बुंदीचे लाडू खाऊन सर्वांचे तोंड गोड झाले. विश्वस्त सौ. वृंदा जयकर तसेच श्री. अभिजित विजयकरांकडच्या टॉफीज आणि सोशल समाजातर्फे लाडू व फरसाणची पाकिटेही देण्यात आली.

जाताना सकाळी पावसानेही इमाने इतबारे हजेरी लावली. यावर्षी सहलीमधील जुन्या व नव्या ज्ञातींची उपस्थिती कमी असली तरी उत्साह द्विगुणीत होता. सकाळचा पावसाळी गारवा आणि पावसाच्या तुषारांसह मंडळी रिसॉर्टवर पोहोचली. इडली, छोले-भटुरेसारख्या नाश्त्यानंतर इच्छुक मंडळींनी रेनडान्स, स्वीमिंगचा मनमुराद आनंद लुटला. दुपारच्या वेज, नॉनवेज जेवणानंतर निसर्गाच्या गारव्याबरोबरच संगीत खुर्ची, पासिंग द पार्सल, हौजीसारखे खेळ मंडळींनी मोठ्या उत्साहाने सहभागी होऊन खेळले आणि वेगवेगळी बक्षिसे प्राप्त केली.

(पान ३ कॉलम ४ वर)

# यलो स्टोन नॅशनल पार्कची सफर

**-सौ. सुरुची अनिल प्रधान**

२२ जून २०१५ सोमवार या दिवशी सकाळी दहा जणांच्या गाडीने आम्ही Des Moines (IOWA) हून निघालो. प्रथम उत्तरेला व नंतर पश्चिमेला प्रवास सुरू केला.

सरळ रस्ता, दुतर्फा हिरवीगार झाडी, येणाऱ्या वाहनांचा वेगळा रस्ता, वाहनांनी पाळलेली रस्त्याच्या लेनची शिस्त; यामुळे प्रवासाला सुरुवात छान झाली. कॅसे गावाजवळ पवनचक्क्या दिसल्या. वॉलनट गावाजवळ पण खूप पवनचक्क्या पहावयास मिळाल्या. वाटेत मका व सोयाबीनची शेते लागली.

IOWA स्टेटच्या उत्तरेला असलेल्या सू सिटीच्या दिशेने आमचा प्रवास सुरू झाला. सू सिटीला जेवण घेऊन पुढच्या प्रवासाला निघालो. साऊथ डाकोटा मधील रॅपिड सिटीच्या दिशेने आमचा प्रवास सुरू होता. रॅपिड सिटी हे डेमॉईनपासून २०० मैलांवर आहे. वाटेत मिसरी नदी लागली.

यलो स्टोनला जाताना आय गो वेस्ट या रस्त्यावरून १३१ या रस्त्याला बाहेर पडले की बॅड लॅंडचा रस्ता लागतो.

बॅड लॅंड ही साऊथ डाकोटा स्टेटमध्ये शेकडो एकरात पसरलेली आहे. लाखो वर्षांपूर्वी या ठिकाणी उथळ समुद्र होता. त्यानंतर त्यात जमिनीत फेरबदल होऊन बॅड लॅंडचे रॉक फॉर्मेशन झाले आहे. इथे बऱ्याच प्राण्यांचे फॉसिल पहावयास मिळतात. या भागात बऱ्याच ठिकाणी रॅटल स्नेक्स आहेत; असे बोर्ड वाचावयास मिळतात. आतल्या डोंगररांगांतून फिरतांना लाकडाच्या ट्रेल्स आहेत. त्यावरूनच चालावे, असे लिहिले आहे. झाडे, झुडपे, फुले विरळाच दिसतात. इथे डोंगरातच अस्ताला जाणारा सूर्य फारच छान दिसला.

२३ जूनला मंगळवारी सकाळी रॅपिड सिटीपासून २७ मैलावर असलेल्या माऊंट रेशमोर पाहावयास गेलो. शिल्पकार गुट्झॉन बोरग्लम याने साऊथ डाकोटा येथील ब्लॅक हिल्स या डोंगरात अमेरिकेच्या चार अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफरसन, थिओडारो रूझवेल्ट व अब्राहम लिंकन यांचे चेहरे कोरले आहेत. १९२७ ते १९४१ या काळात ४०० मजुरांना बरोबर घेऊन त्याने हे काम पूर्ण केले. त्यानंतर ब्लॅक हिल्स नॅशनल फॉरेस्ट पाहिले. तिथे जाताना जो रस्ता आहे; त्याचं नाव आहे आयर्न माऊंटन रोड. कारण पूर्ण डोंगर हायमॅताइटचा आहे. यानंतर त्याच दिवशी कस्टर नॅशनल पार्कमधील वाईल्ड लाईफ पाहावयास गेलो. इथे हरणे, रानगवे (बायसन), प्रायरी डॉग, रान गाढवे पहावयास मिळाली.

नीडल्स हायवे रोड या रस्त्यावरून जाताना डोंगरांचे सुळके सुईप्रमाणे दिसतात. एके ठिकाणी तर सुईला असलेल्या नेढ्याप्रमाणे भोक होते. रस्ता अतिशय अरुंद होता. मध्ये मध्ये बोगदे होते. वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा आकार चौकोनी खोलीप्रमाणे होता.

नंतर रात्री परत माऊंट रेशमोरला जाऊन इनफर्मेशन शो व लाईट्स लावलेले पाहिले. डोंगरातील शिल्पावर टाकलेल्या दिव्यांच्या झोतामुळे ते दृश्य छानच दिसत होते.

२४ तारखेला बुधवारी सकाळी रॅपीड सीटी सोडून व्हायोमिंग स्टेटच्या दिशेने निघालो. रॅपिड सीटीपासून १०० मैलांवर असलेला डेव्हिल्स टॉवर पाहिला. हे नॅशनल मॉन्यूमेंट आहे. या ठिकाणी अमेरिकेतील मूळच्या रेड इंडियन्स लोकांची वस्ती आहे. हा टॉवर लाखो वर्षांपूर्वी निर्माण झालेला आहे. याची उंची पायथ्यापासून ८६७ फूट व समुद्रसपाटीपासून ५११२ फूट आहे. याच्यात दगडाचे तीन प्रकारचे थर आहेत. संपूर्ण टॉवरला फेरी मारण्यासाठी इथे पायवाट आहे.

इथून पुढे व्हायोमिंग स्टेटमध्ये शिरलो. कोडी गावापर्यंतचे अंतर ३१० मैल आहे. वाटेत मिसिपीयन लाईम स्टोन, डेव्होनियम लाइम स्टोन, दगडांचे डोंगर लागले. त्याचप्रमाणे घनदाट झाडी लागली. इथे बरेच हरणांचे कळप व इतर प्राणी दिसले. पठारासारख्या डोंगरावर छोटी निरनिराळ्या रंगांची फुलेही पहावयास मिळाली.

रात्री वापीटी गावात मुक्काम केला. लॉग केबिन्समधील खोल्यांमध्ये राहायला मजा आली. ही कॅबीन्ससुद्धा अद्यावत सोयीने युक्त होती. गुरुवारी २५ तारखेला नाश्ता घेऊन पुढल्या प्रवासास सुरूवात केली. यलो स्टोन नॅशनल पार्कच्या पूर्वेच्या बाजूने आम्ही पार्कमध्ये शिरलो. या पार्कमध्ये चारही दिशांनी आत जायला गेट तयार केली आहेत.

जाताना सिल्वन लेक, एलूर लेक व यलो स्टोन लेक लागले. त्यात यलो स्टोन लेकमध्ये सल्फरच्या फ्यूम्स येताना दिसल्या. लेकमध्येच स्टिव्हन्सन आयलंड आहे. लेकच्या समोर असलेल्या शेरीडोन पर्वताच्या शिखरावर बर्फ दिसत होते. नंतर वेस्ट थंब गीझर बेसीन पाहिले. येथे सल्फर पाण्यात असलेली अनेक कुंडे होती. सर्वात जास्त मोठे गरम पाण्याचे झरे जगात इथे अप्पर गीझर बेसीन मध्ये पहावयास मिळतात.

शाळेत असताना भूगोलाच्या पुस्तकात वाचलेले आठवते की, उत्तर अमेरिकेत गरम पाण्याचे झरे व कुंडे आहेत. प्रत्यक्ष बघितल्यावर मात्र फारच छान वाटले. येथून २० मैलांवर असलेल्या प्रसिद्ध ओल्ड फेथफूल नावाचा हॉट स्प्रींग पहावयास गेलो. याला ओल्ड फेथफूल म्हणतात कारण हा अतिशय पूर्वीपासून आहे आणि आधी वर्तवल्याप्रमाणे ठराविक वेळेला जमिनीच्या पोटातून आवाज येऊन कितीतरी उंचावर कारंजाप्रमाणे सल्फरमिश्रित पाणी बाहेर येते. या ठिकाणी त्याच्या आजूबाजूच्या जमिनीवर उतरता येत नाही.

शुक्रवार २६ जूनला सकाळी निघालो. वाटेत सर्व बघत बघत इस्ट गेटनेच यलो स्टोन पार्कमध्ये शिरलो. काही मैलांवर असलेला मड वोल्कॅनो तिथे मड गिझर, ड्रॅगॉन्स माऊथ स्प्रिंग व सिझलर्स स्प्रिंग पाहिले. ड्रॅगन स्प्रिंग या ठिकाणी जनावर ओरडल्याप्रमाणे आवाज येत होता. तर सिझलर्स स्प्रिंग या ठिकाणी आपण हॉटेलमध्ये सिझलर्स मागवतो त्यावेळेस जसा चर्र आवाज येतो; तसाच आवाज येत होता.

नंतर कॅनयन व्हिलेज मध्ये अप्पर आणि लोअर वॉटर फॉल्स पाहिले. कॅलसाईट स्प्रिंगमध्ये सल्फरमुळे बाजुच्या कॅलसीटे दगडातले तेल पाण्यात मिसळून प्रवाह तयार होतो. पॅट्रीफाईड ट्री पाहिले. हे फक्त झाडाचे फॉसील आहे. झाडामधल्या पेशींची जागा मीनरल्सने घेतली आहे.

नंतर आम्ही नॉर्थ गेटने प्रवास सुरू केला. मॅमुथ हॉट स्प्रिंग्स पाहिला. या ठिकाणी आम्ही पंचेचाळीसावी लॅटीट्यूड क्रॉस केली. उत्तरेचे दार गार्डीनर गावाजवळ आहे. यानंतर आम्ही व्हायोमिंग स्टेट मधील बीग स्काय गावातील एका हॉटेलमध्ये मुक्काम केला. येथेही सर्व सोयीने युक्त अशा लॉग-केबिन्स मध्येच राहिलो.

इथे रांच हिस्ट्री आहे. १९३६ मध्ये डॉ. कॅरॉलिन मॅकगील हिने हे खरेदी करून लोकांसाठी सॅनेटोरीयमसारखी व्यवस्था केली होती. ही बाई स्वत: पहिली पॅथॉलॉजिस्ट (मोन्टाना गावातील) होती. ही जागा अतिशय सुंदर होती. हॉटेलच्या जवळून नदीचा प्रवाह होता. आजुबाजूला डोंगर होते. सकाळी गावातून फेरी मारली. संध्याकाळी नदीच्या पाण्यात सर्वांनी खूप मजा केली.

रविवार २८ जूनला सकाळी बिग स्काय गाव सोडले. यलो स्टोन पार्कच्या पश्चिमेच्या दिशेने आत शिरलो. रस्ता बराच सरळ होता. रस्त्याच्या बाजूने मॅडीसन नदी वाहात होती. आम्हाला मॅडीसनला जायचे होते. वाटेत गीब्बन वॉटर फॉल पाहिला. बेरिल हॉट स्प्रिंग, नॉरिस गीझर बेसीन, पॉर्सीलेन बेसीन, स्टीम बोर्ड गीझर, मॅमोथ्स हॉट स्प्रिंग, अप्पर टेरन्स पाहिले. येथे नदीच्या पाण्यात CaCo3 deposit होऊन (Tavertine) तयार होते.

ऑरेंज स्प्रिंग येथे वाहणाऱ्या पाण्यातून अतिशय सुंदर दृश्य दिसत होते. नंतर आम्ही व्हाईट एलिफंट बॅक टेरेस, एन्जल टेरेस, लिबर्टी कॅप पाहिले. येथे कॅल्शियम कार्बोनेटचे डिपोजिशन झाले आहे.

नंतर परतीच्या वाटेवर साऊथ डाकोटा स्टेटमधील मिशेल या गावी कॉर्न पॅलेस पाहिला. पूर्ण पॅलेस लाकडाच्या फ्रेमवर खरी रंगीत मक्याची कणसे लावून तयार केला आहे.

वाटेत दोन ठिकाणी मुक्काम करून सोमवार ३० जूनला आम्ही Des Moinesuee परत आलो.

*

(पान २ कॉलम ४ वरून)

सर्व खेळांची सर्व बक्षिसे सं. चिटणीस सौ. नीता सेंजित यांच्यातर्फे; तर विश्वस्त श्रीमती वंदना नवलकर यांच्या हस्ते देण्यात आली.

वेगवेगळ्या बक्षिसांबरोबरच डॉ. जतीन धुरंधर यांनी सर्वात वयस्कर उत्सुक सहभागी म्हणून बक्षीस पटकावले, तर लहान बच्चे कंपनीमध्ये विवान व अक्षत यांनी बक्षिसे प्राप्त केली. नेहमीप्रमाणे सर्वात आधी सहलीचे पैसे भरण्याचे बक्षीस श्री. सुनील वाझकर यांनी पटकावले.

यावर्षी इतर नव्या ज्ञातीयांबरोबरच विरारचे श्री. किरण कमलाक्ष कोठारे यांनी विशेष उत्साहाने सहकार्य करून सहलीचा आनंद घेतला. समाजाच्या वर्षासहलीवर सुंदर कविताही रचली.

ओळख परेडमध्ये सर्व नव्याजुन्या ज्ञातियांनी आपापली ओळख करून घेतली आणि सहलीचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल समितीचे कौतुक करून पुढल्या वर्षीही उत्साहाने सहभागी होण्याची इच्छा दर्शवली. श्री. नरेश मानकरांनी रु. २०००/-ची समाजाला देणगी दिली.

संध्याकाळी चहा बिस्किटांचा आस्वाद घेऊन मंडळी परतीला निघाले.

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा २३-०८-२०१५ रोजी प्रभु सेमिनरी शाळा सभागृहात सायंकाळी ५ वाजता होईल.

## अभिनंदन

डोंबिवली येथील रोट्रॅक्ट संस्थेच्या अध्यक्षपदी श्री. वीरधवल दिपक तळपदे यांची नियुक्ती झाली. २५०हून अधिक मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात वीरधवलने आपल्या पाठारे प्रभु ज्ञातीचा आणि आईवडिलांचा गौरवाने उल्लेख केला. प्रभुतरुणाचा प्रत्युष, सोशल समाजाचा दिपोत्सव, प्रभातचा वार्षिकोत्सव- अशा कार्यक्रमात नृत्यसादरीकरण आणि कोरियोग्राफीमध्ये वीरधवल झळकला आहे. वयाच्या अवघ्या पंचविशीत हा ४४व्या अध्यक्षपदाचा मान लाभल्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

## हसरी रेखा

**-प्रदीप कोठारे**



# कापसाचा भूकंप

**-विश्वास अजिंक्य**

(ज्या कापसाच्या भूकंपाबद्दल विश्वास अजिंक्य यांनी माहितीपूर्ण लेख लिहिला आहे त्या भूकंपाचे आधी उपभोगकर्ते आणि नंतर बळी ठरलेले रावबहादूर श्री. गजानन रामचंद्र कोठारे हे विश्वासचे पणजोबा आणि माझे आजोबा (माझ्या आईचे वडील) होते. खामगावला त्यांची स्वत:ची जीनिंग फॅक्टरी होती. ते ब्रिटिशांच्या शासनात सक्रीय नेते होते. हिंदु मुस्लीम तंट्यात त्यांनी या दोन जमातींचा सलोखा घडवून आणण्यासाठी निर्भिडपणे नेतृत्व केले होते. एक सामाजिक सुधारणावादी म्हणून त्यांची ख्याती होती. उद्योगपती वालचंद हिराचंद यांनी या 'भूकंपा'च्या हादऱ्यात त्यांना मित्रत्वाच्या नात्याने सक्रीय मदत केली होती. सरकारने त्यांना 'रावबहादूर' ही पदवी देऊन (आजची 'पद्मभूषण'!) सन्मानित केले होते. त्यांच्या मृत्यूनंतर खामगावात त्यांच्या नावे एका चौकाचे नामकरणही करण्यात आले. आपल्या ज्ञातीशी लेखातील घटना निगडीत असल्याने या लेखाचे पुनर्मुद्रण करीत आहोत.

- संपादक)

इ. स. १८६१ ते १८६५ चा काळ हा हिंदी कापसाचे सुवर्णयुग मानला जातो. मुंबई शहरात दारिद्र्य व श्रीमंती यांचा पाठशिवणीचा खेळ सतत सुरू असतो. परंतु १९व्या शतकाच्या १९६४-६५ या दोन वर्षात लक्ष्मीच्या चंचलतेचा असा काही जबरदस्त फटका बसला, की मुंबईच्या इतिहासात हे नमूद करणे भाग आहे.

मुंबईत कापसाचा व्यापार इ. स १७५० पासून सुरू झाला. तत्पूर्वी सर्व व्यापार कल्याणच्या बंदरातून चालत असे. कल्याण ही मोठी बाजारपेठ होती. मुंबईत हा कापूस बाहेरगावाहून येत असे व इथून तो युरोप खंडात आणि चीनला जात असे. तथापि इंग्लंडमधील कापड गिरण्यांना मात्र पुष्कळ वर्षांपासून अमेरिकेतूनच कापूस जात असे. तेथे त्याचे तलम धोतरजोड्यात रूपांतर होऊन त्या भारतात विकावयास येत असत.

१८६१ साली गुलामगिरी बंद करण्याच्या मुद्द्यावरून अमेरिकेच्या उत्तरेकडील संस्थानांची दक्षिणेकडील संस्थानांशी लढाई सुरू झाली. त्यामुळे अमेरिकेतील कापूस इंग्लंडला जाईनासा झाला. त्यामुळे भारतात पिकलेल्या कापसाला अचानक इंग्लंडवरून मागणी येऊ लागली. मुंबईचे नशीब अकस्मात उजाडले. अमेरिकेतील यादवीमुळे मुंबईच्या कापसाचा भाव वाढवून श्रीमंतीचा महापूर आला. भडोच, सुरत, जंबूसर, भावनगर, बारशी, नगर, धारवाड, खानदेश अशा अनेक ठिकाणांहून मुंबईत कापूस येऊ लागला. कापसाला खूप मागणी होती व किंमतसुद्धा चांगली मिळे. वाहतुकीच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून कापसातील सरकी काढून टाकल्यावर कापसाच्या घट्ट अशा गाठी बनल्या जातात. त्यासाठी पूर्वी चिंचेच्या लाकडाचे साधे यंत्र करून त्यामध्ये ते गठ्ठे घालून थोडेसे लहान करीत. कालांतराने वाफेच्या यंत्रावर कापूस दाबून दगडासारखा घट्ट करून त्याच्या गठड्या बांधल्या जाऊ लागल्या. त्यावेळी टाऊन हॉलसमोरील सर्व जागा मोकळी होती. तेथे कापसाच्या गठड्या ठेवत. त्याचबरोबर चर्चगेटजवळील मोकळ्या जागेत कापसाचा साठा केला जात असे. या गाठींचे वजन वेगवेगळ्या देशात वेगवेगळे असते. भारतात या गाठीचे वजन साधारणत: १७० किलोग्रॅम एवढे असते. तर अमेरिकेत ते ५०० पौंड म्हणजे २२७ किलोग्रॅम इतके असते. १८६१ साली केवळ युरोप खंडात मुंबईहून ७,१७,८२१ कापसाचे गठ्ठे गेले. १८६२मध्ये मुंबईत मोठ्या व्यापाऱ्यांपैकी कोणाला ७० कोणाला ४०, कोणाला ३०, तर कोणाला दहा लाख रुपये इतका प्रचंड नफा झाला होता. मुंबईत आलेल्या या पैशाच्या प्रवाहाने व्यापारी लोकांना वेडे करून सोडले. १८६४ मध्ये तर मुंबईतील कापसाच्या व्यापाऱ्यांची भरभराट अक्षरश: शिगेला पोहोचली होती. कापसाची निर्यात चौपट झाली होती. तर कापसाचा भाव दसपट झाला होता. लोकांनी आपल्या घरातील गाद्या, उशा, तक्के, लोड जिथे जिथे कापूस मिळेल तो सारा इंग्लंडच्या मागणीत घातला. या चार-पाच वर्षात जवळपास ७० ते ८० दशलक्ष स्टर्लिंग पौंड कापसाच्या मोबदल्यात मुंबईत आले. त्यामुळे १८६४ला मुंबईत दणक्यात दिवाळी साजरी करण्यात आली. व्यापाऱ्यांनी 'अत्तराचे दिवे जाळणे' ही म्हण प्रत्यक्षात आचरणात आणली. या वैभवाच्या दिवाळीत ओव्हल मैदानावर फटाक्यांच्या आतषबाजीचा प्रयोग आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी मुंबईतल्या साऱ्या सरकारी-बिनसरकारी, काळ्या-गोऱ्या प्रतिष्ठित नागरिकांना पाचारण केले गेले होते. बेसुमार पैशांच्या उलाढाली होत होत्या. घोड्यांना चांदीचे दागिने, तसेच घोड्याच्या बग्गीला जेथे सजावटीसाठी पितळेचा वापर होत असे तिथे चांदी वापरून आपल्या गडगंज श्रीमंतीचे प्रदर्शन केले जात होते. काही महाभाग तर शंभर रुपयाच्या नोटीमध्ये तंबाकू घालून सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करीत असत.

पैसा हाती खेळू लागल्याने बँकबेचा समुद्र हटविण्याच्या संकल्पाच्या कितीतरी कंपन्या निघाल्या होत्या. त्यावेळी मुंबईतल्या काही धनाढ्य, व्यापारी व प्रतिष्ठित मंडळींनी मुंबईचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एलफिंस्टन लँड अँड प्रेस कंपनी काढली होती. १८६१ ते १८६४ या काळात येथील धनिकांनी अमाप धन मिळविले आणि ते मुंबई घडविण्यासाठी खर्च केले.

त्यावेळी प्रेमचंद रायचंद या शेअर ब्रोकरना लोक 'कापसाचा राजा' म्हणत. जनतेचा त्यावेळी प्रेमचंदवर इतका विश्वास होता की त्याने कंपनी काढली की मागचा पुढचा विचार न करता लोक त्या कंपनीचे शेअर खरेदी करत. शेअर्सना तुफान मागणी असे. मुंबई सरकारच्या माझगांव येथील जागेत दारूगोळ्याचा व शस्त्रास्त्रांचा प्रचंड मोठा साठा ठेवलेला होता. ती जागा 'गन पावडर वर्क्स' या नावाने ओळखली जायची. नुकतेच १८५७चे स्वातंत्र्यसमर होऊन गेले होते. सुरक्षेसाठी व सैन्याच्या सोयीसाठी दारूगोळा निर्मिती व शस्त्रास्त्रांचा साठा अन्यत्र हलवून सरकारने माझगांवची जागा विकायला काढली. हस्ते परहस्ते ती जमीन प्रेमचंदने चाळीस लाखाला विकत घेतली आणि ही जमीन विकसित करण्यासाठी लिमिटेड कंपनी काढली. प्रेमचंदवरील लोकांच्या विश्वासामुळे या कंपनीचे शेअर्स हातोहात खपले. या धामधुमीत मुंबई सरकारने कायद्यात बदल करून स्थावर जंगम मालमत्तेच्या तारणखेरीज श्रीमंत आणि प्रतिष्ठित व्यक्तींच्या फक्त हमीवर बँकेतून कर्ज घेण्याची सवलत जाहीर केली. प्रेमचंद आणि कंपनीने या सवलतीचा फायदा उठविला. प्रेमचंद निरनिराळ्या कंपन्या काढू लागला. शेअर्सची किंमत आज १०० रु., उद्या १२५ रु., तर परवा १५० रु. अशी वाढत गेली. जे अल्पसंतुष्ट होते ते पैसा कमावून गप्प बसले. १८६४ या वर्षी पैशाच्या अशा बेसुमार उलाढाली होत होत्या. ही उलाढाल एकाची टोपी दुसऱ्याच्या डोक्यावर चढविण्यासारखी होती. फक्त कागदावरच करोडो रुपयांचा व्यापार होत होता. या धामधुमीला त्या काळात 'शेअर मनिआ' म्हणत. अमेरिकेतील यादवीने हिंदी कापूस एकदम महागल्याने मुंबईच्या व्यापाऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटले. अमेरिकेतील लढाई किती काळ चालेल हे निश्चित नसले तरी ती यादवी १८६५ मध्ये अचानक थांबून हिंदी कापसाचा व्यापार गडगडेल अशी शंकाही व्यापारी वर्गाच्या मनाला शिवून गेली नव्हती. लढाई आणखी काही वर्षे चालेल या अंदाजाने व्यापाऱ्यांनी साठवून ठेवलेल्या कापसाचे भाव १८६५ मध्ये युद्ध थांबताच कोसळले. शेअर बाजारही आपटला. मुंबईतील व्यापारी वर्ग दिवाळखोरीच्या खड्यात कोसळला. कापसाच्या व्यापारातले अनेक धनिक रसातळाला गेले. या संकटाचे मूळ प्रेमचंद होत. अशा समजूतीने ज्या प्रेमचंद यांचा एकेकाळी सर्वत्र जयजयकार चालला होता त्या प्रमेचंदांच्या वाट्याला शिव्यांची लाखोली आली. याच प्रेमचंद रायचंद यांनी दिलेल्या साडे चार लाख रुपयांच्या देणगीतून मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथसंग्रहालयाची इमारत व त्यालगतचा शिखरावर घड्याळ असलेला राजाबाई टॉवर बांधण्यात आला. राजाबाई हे त्यांच्या आईचे नाव!

१ जुलै १८६५ या दिवसाला मुंबईच्या इतिहासात काळा दिवस म्हटले गेले. आदल्या वर्षी म्हणजेच १८६४ मध्ये दणक्यात दिवाळी व पुढच्याच वर्षी दिवाळे असे दारूण स्थित्यंतर व्यापाऱ्यांच्या नशीबी आले. या घटनेपायी हजारो माणसे नागवली. जिकडे तिकडे हाहाकार माजला.

परंतु कापसाचा हा भूकंप होण्यापूर्वी व्यापारी वर्गाने मिळविलेले प्रचंड धन मुंबई घडविण्यासाठी खर्च केल्यामुळे 'व्हिक्टोरियन युगाचे जगातील सर्वोत्तम शहर' या संज्ञेला मुंबई पात्र ठरली. तेव्हाच्या गॉथिक शैलीतील इमारती आजही मोठ्या डौलाने उभ्या आहेत. तर १८५३ मध्ये मुंबईत सुरू झालेल्या आगगाडीचे जाळे दहा-पंधरा वर्षातच देशभर पसरले. आणि मुंबईचा दूरदूरच्या शहरांशी संपर्क जोडला गेला. कर्मधर्म संयोगाने सुवेझ कालव्याचे कामही १८५६ ते १८६९ या कालावधीत पूर्ण झाले व सागरी वाहतुकीस खुला झाला. युरोपातून मोठाल्या बोटी मुंबईस येऊ लागल्यावर शिडाच्या बोटी जाऊन आगबोटीचे युग सुरू झाले. १९ व्या शतकाच्या मध्यावर घडलेल्या या तीन घटनांमुळे आधुनिक युगात प्रवेश करताना सुरुवातीलाच जबरदस्त झेप घेतल्यामुळे मुंबईचे सारे चित्रच पालटले आणि समुद्राने व्यापलेल्या या लहानशा भूभागाला भव्य वैभवशाली रुप प्राप्त झाले. पुढे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यावर मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली आणि आज ती भारताची आर्थिक राजधानी आहे.

('लोकसत्ते'तून साभार)

*

लेख क्रमांक ७

# अग्निहोत्र - २

-सौ. विजयश्री नवलकर

तो दिवस कोणता होता हे मला आठवत नाही. परंतु बहुतेक शनिवार किंवा रविवार असावा. मी माझ्या मैत्रिणीच्या नातीच्या लग्नाला जाण्यासाठी डोंबिवलीला जाणारी गाडी पकडण्याच्या तयारीत होते. दादर स्टेशनवर मी पटकन गाडीत उडी मारून चढले आणि गाडी सुरू झाली. गाडीत जास्त गर्दी नव्हती. त्यामुळे स्त्रियांच्या डब्यात नजर फिरवीत असतानाच माझे लक्ष एका स्त्रीकडे केंद्रीत झाले. ती माझी बालपणीची मैत्रीण नयना होती. 'अगं नयना' म्हणून मी हाक मारल्यावर ती दचकून पहावयास लागली. समजत नव्हते; कोण हाक मारतेय. मी जवळ जाऊन हातात हात मिळवल्यावर ती ओरडली-, सुलोचना तू, ''मी म्हणाले, ''आता ओळखलेस ना?' दोघींचा आनंद गगनात मावेनासा झाला. कारण दोन नद्यांचे पाणी दूर जाऊन एकमेकात मिसळल्यावर जसे वाटते तसं आमचं झालं. इकडच्या तिकडच्या गप्पा मारता मारता ती मला म्हणाली 'तुझ्यात जास्त बदल झालेला दिसत नाही. तुझं हसणं, विनोदी बोलणं या जशाच्या तशा आहेत!'' तुझ्या या वैशिष्ट्याची 'रेसीपी' मला सांग. मी म्हणाले, 'खरं सांगू का?' 'अग्निहोत्र हीच रेसिपी' आपण जरा या विषयावर बोलूया.''

ती म्हणाली, ''इतकी उत्साही आणि ताजेतवानी राहिलेली तू ताकदवान कशी दिसतेस?'' मी म्हणाले, ''तूच ओळख!'' मला ती जेव्हा सांगायला लागली, ''खुळी मी शिवपूरी (अक्कलकोट) येथे जाऊन आले. तेथील लोकांनी मला सांगितले तुम्ही 'अग्निहोत्र' सुरू करा, म्हणजे तुमच्या सर्व समस्या दूर होऊन तुम्हाला कुठलाही रोग पटकन होणार नाही. कारण 'अग्निहोत्र' माणसांच्या मनावरचा ताण कमी करते.'' ''सुलू तुझा या जुन्या वैदीक विज्ञानावर विश्वास आहे का? काय एकविसाव्या शतकात म्हणे 'अग्निहोत्र करा' आपल्यासारख्या शिकलेल्या लोकांनी यावर विश्वास ठेवायचा का? मग आपल्या पदव्या काय फेकून देऊ या का?''

''असं काही बोलू नकोस. आपल्याला पूर्वी योगविद्येबद्दलही असेच वाटायचे. पण तुला ठाऊक आहे. परदेशातील लोक संस्कृत शिकून मंत्र बोलावयास शिकतात आणि दररोज सातत्याने 'अग्निहोत्र' करतात. जगाच्या पाठीवर सर्वत्र याचा प्रसार झाला आहे. तूच विचार कर. जगात सर्वत्र प्रदूषण पसरले आहे. आपलं जीवन धकाधकीचं झालं आहे. आपण किती गोष्टींना तोंड देतो. घरातून बाहेर गेलेली व्यक्ती परत घरी येईपर्यंत जीवात जीव नसतो. दररोज आग लागणे, इमारती पडणे, रेल्वे अपघात, रस्त्यावर होणारे अपघात, रस्त्यावरून चालताना होणारे अपघात, वेगवेगळ्या प्रकारचे होणारे रोग, खून, मारामाऱ्या, बलात्कार, भाऊबंदकी, कुणालाही कुणाबद्दल न वाटणारे प्रेम आणि पैसा मिळविण्यासाठी काहीही करणारी तरुण पिढी, राजकारण्यांच्या मारामाऱ्या, टोमणे मारून बोलण्याची पद्धत, आणि जनतेकडे पहाण्याऐवजी स्वत:च्याच खिशात जास्तीत जास्त पैसा कसा येईल ही वृत्ती. नयना मला फार दु:ख होते.

आपल्या अगोदरच्या पिढीला 'स्त्री' स्वातंत्र्यासाठी झगडावे लागले. आपल्या पिढीला लाभलेले नि:स्वार्थी लोक, सावरकर, सुभाषबाबू, बाबू गेनू, भगतसिंग, राजगुरु, गांधीजी, नेहरू इ. लोक परत जन्माला येतील का? त्याचप्रमाणे आगरकर, टिळक, महर्षि कर्वे यांना देव परत पाठवेल का?

आता या प्रदुषित झालेल्या लोकांना आपण काय सांगू शकतो? देवळात दर्शनाला जा. परंतु देवाचे दागिने चोरू नका. राजकारण्यांना सांगूया वेगवेगळे घोटाळे करून जगण्यापेक्षा मानाने लोकांना सुख देऊन जगा. सध्या वृद्धांना अपमानीत जगावे लागते. नवी पिढी, फक्त पैसा असला तरच आई आणि बाप हवे असतात. नाहीतर जसे फर्निचर बदलतो तसा आई वडिलांना राहण्यास वेगवेगळ्या वृद्धाश्रमाची चौकशी करतात. हा सर्व परिणाम फक्त प्रदुषणाचा आहे. प्रदूषण दूर करण्यासाठी आणि कुटुंबाचं वातावरण चांगलं रहावं म्हणून वेदांत सायन्सचा हा एक प्रकार आहे. उत्तम आरोग्य, मन:शांती, सकस धान्योत्पादन यासाठी आपणास एकच उपाय आहे

यज्ञेन यज्ञ मयजंत देव:
तानी धर्माणी प्रथमान्यासन।

यज्ञाद्वारे यज्ञ नारायणाची पूजा केली तोच प्रथम धर्म (अग्निहोत्र)

आपले पूर्वज काही मूर्ख नव्हते. ते त्यावेळीसुद्धा यज्ञ करून वातावरण शुद्धी होण्यासाठी दररोज 'अग्निहोत्रा'सारखा छोटा यज्ञ करत होते.

प्रदूषण ही एक मोठी समस्या आहे. जीवनसृष्टीचा फार मोठा शत्रू आहे. म्हणजेच ध्वनी प्रदूषण, वायु प्रदूषण, जलप्रदूषण हे त्यातले मुख्य प्रकार आहेत. घरातून, कारखान्यांतून धुराड्याद्वारे पडणारे वायू, कर्कश आवाज, वैज्ञानिक प्रयोगामुळे केलेले स्फोट, दिवाळीत वाजवले जाणारे फटाके, त्यापासून येणारे दूषित वायुधूर, बिडी सिगरेट इ. सर्व माणसांना घातक आहे. या प्रदूषित वातावरणाने गेल्या हजारो वर्षांची मानवी संस्कृती उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे.

आता मी काही सांगितले तर विश्वास बसणार नाही. परंतु 'अग्निहोत्र' मानसिक तणाव कमी करते. कुठल्या प्रकारचे संकट आले तरी ते संकट म्हणून वाटतच नाही. मी तर त्याला 'ॲक्ट ऑफ गॉड' म्हणते. कुणालाही आपण वाईट बोलत नाही. दुसऱ्याच्या चांगल्या किंवा वाईट बोलण्यावर आपणास दुर्लक्ष करता येते. आपले आचार विचार खूप प्रगल्भ बनतात. भांडणतंट्यापासून आपण आपोआप दूर राहतो. कारण वायुमंडल शुद्ध वातावरणामुळे दुषित विचारांचा नाश होतो. आपलं मन सतत आनंदी राहते. निंदा करणाऱ्याची निंदा आपण सहज झेलतो. आणि कुठली गोष्ट मेंदूपर्यंत अगर हृदयापर्यंत पोहचू देत नाही. सतत हसत राहिल्यामुळे आपण आपली वाटचाल सुखाच्या दिशेने वळवतो.

अग्निहोत्र उपासना ही सोपी उपासना आहे. त्यासाठी अल्पवेळच लागतो. नित्य सूर्यास्त व सूर्योदयाला गोमयातून (गाई बैलांच्या शेणाच्या गोवऱ्यांतून) प्रज्वलित केलेल्या अग्नीत मंत्रोच्चारपूर्वक गाईच्या तूपाने माखलेल्या अखंड तांदूळाची आहूती देणे, सूर्यास्ताला दोन आहुती आणि सूर्योदयाला दोन आहूती फक्त या सकाळी संध्याकाळी त्या त्या वेळेप्रमाणे देऊन एकाग्र मन करून आपण बसलो तर त्यासारखा दुसरा आनंद नाही. या आहुती द्यावयाच्या असताना वेळ महत्त्वाची आहे. परंतु पुष्कळांना या वेळा पाळणे अशक्य वाटते. आपण जे मंत्र उच्चार करतो ते सूर्यकिरणांना मिळतात व त्यामुळे वातावरण शुद्धी होते. (कॉस्मीक थिअरी) गाईच्या गोवऱ्याच्या धुरातून आपणास ऑक्सिजन मिळतो म्हणून 'अग्निहोत्र' जीवन पद्धती जीवन जगण्यास सुलभ वाटते. किंबहुना आपण आपल्या शत्रूबद्दल पण 'शुभं भवतू' म्हणतो.''

डोंबिवली स्टेशन केव्हा आले हे समजलेच नाही. मी व माझी मैत्रीण आपल्या ठिकाणी जाण्यास सज्ज झालो आणि 'परत भेटूया' असे म्हणालो.

*

## 'प्रभुतरुण'च्या कोषाध्यक्ष डॉ. सुरेखा यांचे अभिनंदन

हुंडाविरोधी चळवळ मुंबई, या गेली कित्येक दशके हुंडाविरोधी विविध उपक्रम राबविणाऱ्या संस्थेच्या ४२ व्या वर्धापनदिनी पहिला 'कै. सौ. शकुंतला परळकर सेवाव्रती डॉक्टर पुरस्कार' डॉ. सुरेखा धुरंधर यांना प्रदान करण्यात आला. लसीकरण, स्त्रीआरोग्य, सुरक्षित मातृत्व, बालसंगोपन, अपंग पुनर्वसन अशा विविध समस्यांवर २५ वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या डॉ. धुरंधर यांच्या कार्याचा हा उचित सन्मान म्हणावा लागेल. सन १९९१ पासून पल्स पोलिओ लसीकरणाची मोहीम सातत्याने राबवून अनेक शिकाऊ डॉक्टर, स्वयंसेवक आणि परिचारिकांना प्रशिक्षण देण्यास डॉ. धुरंधर यांनी सुरुवात केली. सांताक्रुझ येथील साने गुरूजी विद्यालयात सतत १२ वर्षांपासून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून किशोरवयीन मुलांमधील लैंगिक शिक्षणाच्या जाणीव जागृतीसाठी त्यांनी विविध प्रकारे परिश्रम घेतले. गोरेगाव येथील अ. भि. गोरेगावकर शाळेत खुल्या व्यायामशाळेची कल्पना राबवण्यात पुढाकार घेतला. मुलांना व्यायामाचे महत्त्व पटवून दिले. डॉ. धुरंधर यांनी आपले कार्यक्षेत्र विस्तारत अपंगांनाही आपल्या पंखाखाली घेतले. अपंगांना दया नाही; तर समाजाची साथ हवी असते, हे जाणून लोकमान्य सेवा संघाच्या कलबाग अपंग पुनर्वसन केंद्रातील जयपूर फूट सेंटरमधून कृत्रिम पायाची साधने पुरविण्यासाठी आणि त्याविषयी प्रबोधन घेतले. केवळ शहरातील मुलांपर्यंतच आपले कार्य त्यांनी मर्यादित ठेवले नाही, तर आदिवासी भागातील मुलांच्या आरोग्यासाठीही त्यांनी भरीव कार्य केले आहे. पालघर जिल्ह्यातील मासवण येथील आदिवासी सहज शिक्षण परिवाराच्या माध्यमातून दरवर्षी वैद्यकीय शिबिरे घेऊन तेथील शाळकरी मुलामुलींच्या आरोग्याची काळजी घेतली जाते. तेथील शाळाच डॉ. धुरंधर यांनी दत्तक घेतली. तसेच विविध आदिवासी पाड्यांतून स्वच्छतागृहे बांधून सार्वजनिक आरोग्यासाठी विशेष योगदान दिले. सुरक्षित मातृत्व आणि बालसंगोपन याविषयी नवजात बालकास सहा महिन्यांपर्यंत 'संपूर्ण स्तनपान' ही मोहीम त्यांनी जोरकसपणे राबविली. किशोरवयीन मुलींच्या आहाराविषयी, तसेच योग्य व्यायामासाठी जाणीव जागृती शिबिरे आयोजित केली, तसेच दृष्टिहीन महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध संस्था, शासकीय व बिगरशासकीय योजना यांच्या माध्यमातून त्यांनी प्रयत्न केले आहेत. अशा या व्यक्तिमत्वाला सेवाव्रती पुरस्काराने गौरवित करणे केवळ उचित नव्हे, तर नव्या अभिमानास्पद आहे.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) अॅड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ कै. श्री. मधुकर प. तळपदे यांच्या प्रेमळ स्मृतीप्रीत्यर्थ (२९ मे २०१५) श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे यांजकडून रु. ३०००/-

✶ श्री. नंदकुमार चंद्रकांत धैर्यवान यांजकडून रु. ५००/-

✶ श्री. सिद्धेश रवींद्र अजिंक्य यांजकडून रु. ५००/-

✶ श्री. आणि सौ. श्रीनाथ रमेश जयकरकडून कुमार कपिल श्रीनाथ जयकर याच्या मुंजीनिमित्त रु. ५००/-

✶ श्री. आणि सौ. जीतेश जयपाल तळपदेकडून कुमार आदील जीतेश तळपदे याच्या मुंजीनिमित्त रु. ५००/-

✶ सौ. सुरुचि आणि श्री. अनिल भालचंद्र प्रधान यांजकडून रु. २५१/-

✶ श्री. आनंद डी. एम्. कोठारे आणि कु. संध्या मुकुंदराव तळपदे यांच्या २९-०५-१५ रोजी झालेल्या विवाह माणिक महोत्सवाप्रीत्यर्थ त्यांची कन्या सौ. दर्शना के. मोरवाले यांजकडून रु. २५०/-

✶ श्री. विनोद कोठारे यांजकडून त्यांची कन्या कु. श्रद्धा हिच्या 'नारळसाखर' प्रीत्यर्थ रु. १०१/-

## परीक्षेतील सुयश

**बारावी (सायन्स)**

कु. श्रुती रवी देसाई, प्रथम वर्ग

कु. प्रीति भूषण धुरंधर

४१०/६००, ८२ टक्के

**बारावी (कॉमर्स)**

कु. सुरभी स्वप्नील सुरेश नवलकर

८४ टक्के

**बॅचलर ऑफ आर्किटेक्चर**

कु. ख्याती तेज वेलकर

## Congratulations

Mrs. Vaidehi Shreyas Rane, has been promoted as an Associates- Power Systems Engineer at Beca (Bece is one of the largest employee-owned professional services consultancies that delivers a variety of services across the Building, Government & Defence, Indusrial, Power, Transport and Water Market segments with offices in Australia, New Zeland and Asia). Vaidehi started her career with Beca as Graduate Engineer in 2007 after having completed her Bachelor in Engineering Degree (Electrical & Electronics) from Auckland University with First Class Honours. During her time at Beca, she has also been heavily involved in the Victorian Desalination Project. This plant is one of the largest reverse-osmosis desalination plants in the world at Wonthagi, capable of supplying upto 150 billion litres of water a year. Her dedication and tenecity at work has won her several accolades during her career including being a team leader for the power systems group in Australia.

Being appointed as an Associates recognezes her advanced competence in her profession, with excellent people, client or technical skille. With this appointment, Beca acknowledges her contriburion so far and her porential to add great value to Beca in future. She has demonstrated core Beca values and is working to grow Beca's business and professional reputation as a market leader. This is fundamental career progression step; and she is tasked with inspiring others to share the company's vision and help buile the busines.

Vaidehi has also been appointed as the Secretary of the Women in Engineering for the Sydney Division. The Women in Engineering (WIE) is a not-for-profit organization who is committed to attract, retain, support and celebrate women in the engineering profession industry-wide. WIOE Sydney division establishes and maintains a comprehensive and enduring network providing members with access to careers advice, mentoring opportunities and professional development exposure through social events and community programs

## प्रभुतरुणाची डायरी

### कुर्यात् बटोर्मंगलम्

०८-०५-१५ कपिल श्रीनाथ जयकर
आदिल जीतेश तळपदे

### नारळ साखर दिला

०२-०४-१५ कु. श्रद्धा विनोद कोठारे, श्री. आनंद परब (आं. ज्ञा.)

### नांदा सौख्यभरे

२२-०६-१५ श्री. अमरेश उदय आत्माराम कीर्तिकर, कु. नेला जार्व्हेपेरा (इस्टोनिया) (आं. ज्ञा.)

### विवाह माणिकोत्सव

२९-०५-१५ श्री. आनंद डी. एम्. कोठारे, कु. संध्या मुकुंदराव तळपदे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १०-०७-१५ | डॉ. पुष्पा मोहनलाल राणे | वय ८८, | खार |
| १६-०७-१५ | श्री. दिलीप नारायण व्यवहारकर | वय ७१, | बोरीवली |
| १९-०७-१५ | सौ. विजया सुरेंद्र कीर्तिकर | वय ८७, | खार |
| २०-०७-१५ | श्री. तारकनाथ लक्ष्मीकुमार जयकर | वय ७९, | जोगेश्वरी |
| २७-०७-१५ | सौ. प्रमदा प्रकाश जयकर | वय ६६, | ठाणे |

## THE PATHARE PRRABHU CHARITIES

### Award of Educational Merit Prizes For the Year 2015

The Pathare Prabhu Charities have been awarding Educational Merit Prizes every year to students of our community passing various examinations with merit.

Students passing any examination SSC/CBSE/ICSE/IGCSE onward from recognized university/educational institution during this year are earnestly requested to submit the photocopies of their mark sheets in the office of the Pathare Prabhu Charities, Thakurdwar, between 11.00 a.m. and 5.00 p.m. after the result of the examination is declared but not later than **September 15, 2015** to enable the trustees to award the prizes to the eligible students. The students and parents concerned should note that the merit prizes will be awarded by the Trust only on the basis of the results/mark sheets received by the Trust before the dead line.

This year the Annual Eductional Merit Prize Award Function will be held on **Sunday, 13 December, 2015** at M.V.M. Degree College of Commerce & Science, Mogaveera Bhavan, MVM Educational Campus Marg, off Veera Desai Marg, Andheri West, Mumbai-400058.

Students are requested to furnish the following requirements along with the examination results/marks sheet.

1. Full Name of the Student (Married Female to give maiden name also)
2. Latest coloured photo of the student, postcard size with light background.
3. Full Postal Residential Address.
4. Telephone no.
5. Email adress if available.
6. Confirmation regarding student having bank account: Yes/No
7. Name of the Grandfather
8. Bio data in brief (past racord of academic career)
9. Confirmation whether the student will receive the prize if awarded, by his personal attendence at the function on the aforesaid date

Chief Guest : **Dr. Rahul Rajendra Navalkar** M.B.B.S., D.O., D.N.B., (ophthalmaology) Fellow-Sankara Nethralaya and his wife **Dr. Mrs. Amita Rahul Navalkar** M.D.S. (Oral Diagonosis & Radiology)

For the Board of Trustees,
**Uday S. Mankar**
Chairman-Trustee

चॅरिटीजचे 'न्यूज लेटर' घरोघरी पोहोचले. अभिनंदन

## अभिनंदन

सारस्वत बँकेच्या महाव्यवस्थापक आणि आमच्या लेखिका सौ. उर्वशी धराधर दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर महाराष्ट्राचे माजी अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांच्यासमवेत चर्चेत सहभागी झाल्या. त्यांचे 'अर्थसंवाद' हे सदर पुढील अंकी असेल

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67